**महानगरपालिका क्षेत्राची निवडणूक प्रभागामध्ये विभागणी करण्यासंदर्भातील आदेशा सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये आवश्यक बदल करण्याबाबत...**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २३/०९/२०१४

वाचा :- राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/का.५,
दि.१६ ऑगस्ट, २०११ चे आदेश.

**आदेश**

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए अन्वये राज्य निवडणूक आयोगावर राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे,

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५ मध्ये सुधारणा करुन त्याद्वारे, महानगरपालिकेतील (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) प्रत्येक प्रभागामध्ये शक्य असेल तेथवर दोन मात्र, दोनपेक्षा कमी नाही आणि तीनपेक्षा अधिक होणार नाही इतके पालिका सदस्य निवडून देण्यात येतील अशी तरतूद करण्यात आली आहे,

आणि ज्याअर्थी, उक्त तरतुदी अंमलात आणण्याच्या उद्देशाने महिलांकरिता तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरीकांचा मागासवर्ग यातील उमेदवारांकरिता महानगरपालिकांमधील प्रभागांमध्ये सदस्यांच्या राखीव जागांचे वाटप करण्यासाठी आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्यासाठी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने दि.५ जुलै, २०११ च्या अधिसूचनेद्वारे नियम केलेले आहेत,

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५ खालील स्पष्टीकरणामध्ये प्रभाग रचनेकरिता अलिकडच्या जनगणनेची आकडेवारी, मग ती अंतिम असो किंवा तात्पुरती, वापरण्याबाबत तरतूद आहे,

आणि ज्याअर्थी, उक्त दिनांक १६ ऑगस्ट, २०११ चे आदेश निर्गमित करण्यात आले त्यावेळी सन २०११ च्या जनगणनेची केवळ महानगरपालिकानिहाय एकूण लोकसंख्या उपलब्ध झाली होती, मात्र अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या तसेच प्रगणक गटनिहाय लोकसंख्या प्रसिध्द झालेली नव्हती. परिणामी महानगरपालिकेची एकूण सदस्य संख्या सन २०११ च्या जनगणनेच्या लोकसंख्येच्या आधारे निश्चित करण्यासाठी उक्त दि.१६/०८/२०११ च्या आदेशासोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये सूत्र देण्यात आले होते. मात्र प्रभाग रचना करण्यासाठी व अनुसुचित जाती व अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी अनुज्ञेय सदस्य संख्या सन २००१ च्या जनगणनेच्या लोकसंख्येच्या आधारे ठरविण्यासाठी सूत्र देण्यात आले होते.

आणि ज्याअर्थी, आता सन २०११ च्या जनगणनेची संपूर्ण तपशिलवार आकडेवारी प्रसिध्द झालेली असल्याने यापुढील काळात होणा-या महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचना करण्यासाठी तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी अनुज्ञेय सदस्य संख्या ठरविण्यासाठी सन २०११ च्या जनगणनेची आकडेवारी विचारात घेणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी उक्त दि.१६/०८/२०११ च्या आदेशासोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये योग्य ते बदल करणे आवश्यक झाले आहे.

त्याअर्थी, आता राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त दि.१६/०८/२०११ च्या आदेशासोबतचे परिशिष्ट-१ रद्द करण्यात येत असून त्याऐवजी या आदेशासोबत जोडलेले परिशिष्ट-१ विहित करण्यात येत आहे.

23/5/14

(ज. स. सहारिया)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,

१. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२. सर्व महानगरपालिका आयुक्त.
३. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी.
४. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील.
५. निवड नस्ती.

# परिशिष्ट-१

---------------महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - सन ----------------

१. महानगरपालिकेचे नाव -

२. महानगरपालिका क्षेत्राची एकूण लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार) -

३. निवडून दयावयाच्या महानगरपालिका सदस्यांची संख्या (२०११ च्या जनगणनेनुसार) -

४. प्रभागांची एकूण संख्या -

५. अ) २ सदस्यीय प्रभागांची संख्या -

ब) ३ सदस्यीय प्रभागांची संख्या -

६. अनुसूचित जातीची लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार) -

७. अनुसूचित जमातीची लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार) -

८. प्रभागाची सरासरी लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार) अ) २ सदस्यीय प्रभाग -

ब) ३ सदस्यीय प्रभाग -

(सूत्र - दोन सदस्यीय प्रभाग = महानगरपालिकेची एकूण लोकसंख्या (अ.क्र. २ प्रमाणे) / एकूण सदस्य संख्या(अ.क्र. ३ प्रमाणे) x २)

(सूत्र - तीन सदस्यीय प्रभाग = महानगरपालिकेची एकूण लोकसंख्या (अ.क्र. २ प्रमाणे) / एकूण सदस्य संख्या(अ.क्र. ३ प्रमाणे) x ३)

८.अ)

| प्रभागाची लोकसंख्या | कमाल लोकसंख्या ( अ.क्र.८ च्या १० टक्के अधिक) | किमान लोकसंख्या (अ.क्र.८ च्या १० टक्के कमी) |
|---|---|---|
| २ सदस्यीय प्रभाग | | |
| ३ सदस्यीय प्रभाग | | |

९. अनुसूचित जातीकरिता राखून ठेवावयाच्या एकूण जागा (स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)-

( सूत्र = अनुसुचित जातींची लोकसंख्या (अ.क्र.६ प्रमाणे) / जनगणना- २०११ एकूण लोकसंख्या (अ.क्र.२ प्रमाणे) x अ.क्र. ३ प्रमाणेएकूण सदस्य संख्या )

१०.अनुसूचित जमातीकरिता राखून ठेवावयाच्या एकूण जागा (स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)-

( सूत्र = अनुसूचित जमातींची लोकसंख्या (अ.क्र.७ प्रमाणे) / जनगणना- २०११ एकूण लोकसंख्या (अ.क्र.२ प्रमाणे) x अ.क्र. ३ प्रमाणेएकूण सदस्य संख्या)

११. नागरिकांच्या मागासवर्गासाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागा -
(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

( सूत्र = अ.क्र. ३ मधील एकूण सदस्य संख्या x २७/१०० )

१२. अ) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागा -

( सूत्र = एकूण सदस्य संख्या (अ.क्र.३ प्रमाणे) / २ )

ब) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागांची विभागणी

१. अनुसूचित जातीच्या स्त्रियांसाठी -

( सूत्र = अनुसूचित जातींची आरक्षित सदस्य संख्या (अ.क्र.९ प्रमाणे) / २ )

२. अनुसूचित जमातीच्या स्त्रियांसाठी -

(सूत्र = अनुसूचित जमातींची आरक्षित सदस्य संख्या(अ.क्र.१० प्रमाणे) / २ )

३.नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या स्त्रियांसाठी -

( सूत्र = नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित सदस्य संख्या (अ.क्र.११प्रमाणे) / २ )

४. स्त्रियांसाठी उपलब्ध होणा-या उर्वरित जागा -
( सूत्र = अनुक्रमांक १२(अ) - {अनुक्रम १२(ब१)+१२(ब२)+१२(ब३) } )

५. स्त्रियांच्या एकूण जागा -
( सूत्र = अनु.क्र.१२(ब१) + १२(ब२) + १२(ब३) + १२(ब४))

१३. एकूण अनारक्षित जागा -
( सूत्र = (अनु.क्र.३) - (अनु.क्र.९) - (अनु.क्र.१०) - (अनु.क्र.११) - (अनु.क्र.१२(ब४) )

१४. शेरा

सही

**आयुक्त,---------- महानगरपालिका**

**टिप** - स्त्रियांकरिता राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करता .५० हा अपूर्णांक पुढील संख्येस पूर्णांकित करण्यात यावा.